**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

**मानवाधिकाराचे रक्षण व्हावे - माजी न्यायमूर्ती आर.सी. चव्हाण**
**विद्यापीठात पदव्युत्तर विधी विभागाच्यावतीने 'मानवाधिकार .. ज्वलंत समस्या' विषयावर**
**कार्यशाळेचे उद्‌घाटन संपन्न**

अमरावती.

भारतीय संविधानाने स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्याय हे अधिकार सर्व नागरिकांना बहाल केले आहेत. सर्व मानवी व्यक्ती स्वतंत्र आहेत, त्यांना समान प्रतिष्ठा व समान अधिकार, विचारशक्ती व सद्‌सद्‌विवेकबुद्धी लाभली असून प्रत्येकाने एकमेकांशी बंधुत्वाच्या भावनेने आचरण करावे. पण आज मानवी हक्क उल्लंघनाच्या अनेक घटना दिसून येतात. हे थांबविणे काळाची गरज असून विद्यापीठाचा पदव्युत्तर विधी विभागाच्यावतीने आयोजित कार्यशाळेत थीमच्या अनुषंगाने विचारमंथन होवून नवीन बाबी व मुद्दे समोर येतील, असे मत माननीय मुंबई उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश आर.सी. चव्हाण यांनी मांडले. विद्यापीठाच्या बायोटेक्नॉलॉजी विभागाच्या सभागृहात आयोजित उद्‌घाटन समारंभाप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, विधी विभागप्रमुख डॉ. विजयकुमार चौबे उपस्थित होते.

'मानवाधिकार .. ज्वलंत समस्या' विषयाच्या अनुषंगाने बोलतांना माजी न्यायमूर्ती चव्हाण म्हणाले, संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने पॅरीस येथे मानवाधिकाराचे वैश्वीक घोषणापत्रक स्वीकारले. ते जगातील सर्वाधिक भाषांतरीत घोषणापत्र असून दुसऱ्या महायुद्धात जगाने अनुभवलेल्या नृशंस, अत्याचारांचा परिणाम म्हणून अस्तित्वात आले. सर्व मानवाच्या जन्मसिद्ध मानवाधिकाराची पहिली जागतिक अभिव्यक्ती म्हणून या घोषणापत्रकाकडे पाहिल्या जाते.

मानवाधिकाराला इतिहास आहे, इतिहासामध्येसुद्धा याचा उल्लेख दिसून येतो. कलिंगा युद्धामुळे सम्राट अशोक यांच्या धोरणामुळे मानवी हक्काला प्राधान्य मिळाले. दुसऱ्या महायुद्धानंतर भरलेल्या जिनेव्हा परिषदेत मानवी हक्कांवर भर देण्यात आला. राज्य घटनेतील कलम १९ नुसार मुलभूत अधिकार सर्वांना प्राप्त झाले आहेत; परंतु असे असले तरी भारतासह जगात आतंकवाद मोठ्या प्रमाणावर फोफावत आहे, लोकशाही शासन व्यवस्था नष्ट करण्याचा प्रयत्न होत आहे. हे एकप्रकारे मानवाधिकारावर गदा आणणारे अघोषित युद्ध असून त्यामध्ये सर्वसामान्य माणसांच्या हक्काला आणि सुकर जीवन जगण्याला बाधा पोहचत आहे.

सर्वच देशांमध्ये मानवी हक्कांचे उल्लंघन होतांना आज दिसून येते; पण भारताला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी परिपक्व अशी घटना दिल्यामुळे देशात समानता प्रस्थापित होण्यासाठी महत्वपूर्ण पावले उचलली जात आहे. पुरूष-महिला समानतेमुळे तरूण महिला सरपंच झाल्यात, याचा खरा आनंद आहे. स्थलांतरण, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, समानता हे मुद्देसुद्धा महत्वाचे असून मानवी अधिकारासाठी पूरक आहेत. त्यानुषंगाने त्यांनी सविस्तर विवेचन याप्रसंगी करून भारतात खऱ्याअर्थाने लोकशाही नांदावी, सर्व लोकांचे जीवनमान उंचावे, त्यांच्या अधिकारांचे रक्षण व्हावे, अशी अपेक्षाही व्यक्त केली.

प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर म्हणाले, प्रत्येकास जगण्याचा, स्वातंत्र्य उपभोगण्याचा, सुरक्षित असण्याचा अधिकार आहे. कुणीही कुणाचाही छळ करता कामा नये किंवा क्रूर, अमानुष व कमीपणाची वागणूक देवू नये, यासाठी मानवाधिकार महत्वाचा आहे. आदिवासी भागामध्ये शैक्षणिक संस्थेत काम करतांना आदिवासी लोकांचे जीवन जवळून पाहण्याचा योग आला. अशिक्षित माणसे सर्वांना मिळून मिसळून वागवतात; पण शिक्षित माणसांच्या बाबतीत त्यांचेकडून मानवाधिकाराचे उल्लंघन होतांना काही प्रसंगामध्ये दिसून येते. प्रत्येकाने आपली नैतिकता, सद्‌सद्‌विवेकबुद्धीचा चांगल्या कामासाठी वापर करायला पाहिजे. कुणाकडूनही मानवी हक्कांचे उल्लंघन होता कामा नये, याची दक्षता घेणे महत्वाचे आहे. 'मानवाधिकार .. ज्वलंत समस्या' या विषयाच्या अनुषंगाने विद्यापीठाच्यावतीने आयोजित कार्यशाळेत महत्वपूर्ण विषयांवर चर्चा होवून सर्वसमावेशक समाजोपयोगी बाबी यांमधून पुढे येतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

सुरूवातीला माता सरस्वती व कर्मयोगी संत गाडगे बाबांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण अतिथींच्या हस्ते करण्यात आले. वृक्ष देवून पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक पदव्युत्तर विधी विभागप्रमुख डॉ. विजयकुमार चौबे यांनी केले व कार्यशाळेच्या आयोजनामागील भूमिका विषद केली. संचालन हिमांशू मोरे व पोलिन सॅमसन यांनी, तर आभार डॉ. कल्पना जावळे यांनी मानले. उद्‌घाटन कार्यक्रमाला डॉ. राजेश सिंग, माजी सत्रन्यायाधीश अशोक बाबरेकर, डॉ. अनिता पाटील, ॲड. संजुला चौबे, डॉ. योगिता हुतके, डॉ. नमिता अवस्थी, अर्चना अवघड, स्वप्नील वावरे आदी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते तसेच कार्यशाळेत पन्नासचेवर प्रतिनिधींचा सहभाग होता. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विधी विभागाच्या मुरलीधर खोपडे, अंकित ठाकूर यांनी अथक परिश्रम घेतले.

---

प्रति,  **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी  दि. ११/०२/२०१९.

दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी